# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १६३ वा मंगळवार दि.१० डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## 'मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन सेवा विषयक १३८ प्रकरणे तडजोडीने निकाली तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरीचा लाभ

मुंबई :- महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली. या लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या-





२३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर- खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

## डॉ सितम सोनवणे यांची डिजिटल मीडियाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. नंदकुमार डोळे यांच्या हस्ते सत्कार



लातूर :- व्हाईस ऑफ मिडिया डिजिटल मिडिया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.सितम सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल वैष्णवी नेत्रालयाचे संचालक डॉ. नंदकुमार डोळे यांच्या हस्ते शाल, गुलाबाचे रोपटे, पेढे वाटून सत्कार करण्यात आला , यावेळी दैनिक महावृत्तचे संपादक अशोक हानवते, मुख्याध्यापक राजरत्न निलंगेकर,आर.टी. बोळेगावे, संतोष वाघमारे, बाळू मुक्के आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ११ गुन्हे दाखल.

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ५० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. ११ गुन्हे दाखल.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथके तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

दरम्यान दिनांक ०८/१२/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका, देशी-विदेशी दारू, हातभट्टी व वाळू यांची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्यावर कारवाई करत एकूण ११ गुन्हे दाखल केले असून मटका, दारू, हातभट्टी व वाळू तसेच गुन्ह्यात



वापरलेल्या वाहनासह ५० लाख ६८ हजार ३२० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अवैध धंदे करणाऱ्या एकूण १२ लोकाविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असून वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पोलीस पथकांनी केली आहे.

## लखमापूर येथे अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्यास उत्साहात प्रारंभ

लातूर :- रेणापूर तालुक्यातील लखमापूर येथे श्री दत्त जयंतीनिमित्ताने श्री त्रियोगी दत्त मंदिर येथे लखमापूर आणि मोरवड गावकरी मंडळींच्यावतीने अखंड दत्तनाम सप्ताह, श्री गुरूचरित्र पारायण व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास रविवार, दि. ८ डिसेंबरपासून धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात सुरूवात करण्यात अली आहे.



श्री दत्त जयंतीनिमित्ताने लखामापूर येथे रविवार, दि. ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह सोहळ्यात भागवताचार्य सुरेश महाराज गायकवाड हे सेवा देणार आहे. शिवाय दैनंदिन पहाटे ४ ते ६ काकडारती, सकाळी ७ ते १० गुरूचरित्र पारायण, सकाळी ११ ते दुपारी १ गाथा भजन, दुपारी २ ते ५ भागवत कथा, रात्री ७ ते ९ हरिपाठ, रात्री ९ ते ११ कीर्तन, तर मध्यरात्री ११ ते २ हरिजागर कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताह सोहळ्यात महादेव महाराज बोराडे, ऋषिकेश महाराज कदम, बालकीर्तनकार चैतन्य महाराज राऊत, गोपिचंद महाराज, बाबा महाराज, काका महाराज, ऋषिकेश महाराज, विठ्ठल महाराजांची किर्तन सेवा होणार आहे. शेवटी रविवार, दि. १५ डिसेंबर रोजी जगन्नाथ महाराज देशमुख यांचे काल्याचे कीर्तन होवून भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून सप्ताह सोहळ्याची सांगता होणार आहे. तरी आयोजित विविध कार्यक्रमांचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन लखमापूर आणि मोरवड गावकरी मंडळींच्यावतीने करण्यात आले आहे.

## ७ डिसेंबर ते १७ मार्च दरम्यान जिल्ह्यात १०० दिवशीय क्षयरोग मोहीम

लातूर :- ७ डिसेंबर २०२४ ते १७ मार्च २०२५ कालावधीमध्ये क्षयरोग रुग्ण शोधमोहीम व व्यापक प्रमाणात जनजागृती मोहिम सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर व जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत सर्व आरोग्य संस्थांमध्ये क्षयरोग शोध माहीम प्रभावीपणे राबविणे. अतिजोखमीच्या व्यक्तीमध्ये (मधुमेह, जेष्ठ व्यक्ती, कुपोषित व्यक्ती, व्यसन इत्यादी), औद्योगीक वसाहत, साखर कारखाना कर्मचारी, मजूर, वीटभट्टी, कारागृह, अनाथ आश्रम, वसतिगृह, वृध्दाश्रम इत्यादी ठिकाणी रुग्णशोध माहीम राबविणे. 'टीबीमुक्त कार्यालय' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी गाव पातळीपासून ते जिल्हास्तरापर्यंत सूक्ष्म कृती आराखडा तयार करुन ७ डिसेंबर २०२४ ते १७ मार्च २०२५या कालावधीमध्येही मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी यांना सूचना देण्यात आलेले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग व लातूर जिल्हा क्षयरोग केंद्र व वसंतराव काळे होमिओपॅथिक महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने १० डिसेंबर २०२४ रोजी क्षयरोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते या मोहिमेचे उद्घाटन होणार आहे. या उद्घाटनासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती उपस्थित राहणार आहेत. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस. एन. आणि वसंतराव काळे होमिओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खामितकर एस.सी. यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले आहे.




## युवा नेतृत्व संतोष देशमुख यांचे अपहरण

### काही तासाने आढळला मृतदेह

केज/ प्रतिनिधी-तालुक्यातील मस्साजोग येथील युवा नेतृत्व व माजी सरपंच पती संतोष देशमुख यांचे काही अज्ञाताने दुपारी अपहरण केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर काही तासानंतर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला असल्याने खळबळ उडाली असून कर्तृत्वान युवा कार्यकर्ता गेल्याने मस्साजोग व तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ाबाबत माहिती अशी की, संतोष देशमुख व त्यांचा वाहन चालक हे चारचाकी गाडीतून मस्साजोग कडे जात असताना डोणगाव जवळ दोन वाहणातून येऊन अज्ञात व्यक्तींनी गाडी अडवून गाडीची तोडफोड करून संतोष देशमुख यांचे अपहरण केले असल्याची तक्रार केज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती मात्र काही तासानंतर बोरगाव- दहीटना रस्त्यावर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला असल्याने एकच खळबळ उडाली आहे. संतोष देशमुख हे त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात परिचित आहेत. त्यांनी मस्साजोग ग्रामपंचायत ला अनेक पुरस्कार मिळवून दिले आहेत. या घटनेमुळे तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. नेमका हा प्रकार कसा व का घडला याचा तपास केज पोलीस करत आहेत.



## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संत शिरोमणी संताजी जगनाडे यांची जयंती उत्साहात साजरी

लातूर प्रतिनिधी :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. राहुल डोंबे, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, संस्थेचे कर्मचारी सुभाष गलगले, गुरुप्रसाद बिराजदार, योगीराज माकणे, संगमेश्वर मुळे आणि नंदू काजापुरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रातील संतांनी सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र करून महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या शिष्य परिवारातील संताजी जगनाडे हे एक टाळकरी होते. तुकाराम महाराजांचा संताजींवर प्रभाव होता. तुकाराम महाराज अभंग रचना करत होते आणि त्यांचे लेखनीस होण्याचा बहुमान संताजी जगनाडे यांना मिळाला सनातन्यांनी तुकोबाची गाथा इंद्रायणीत बुडवल्यानंतर संताजी महाराजांना मुखोद्गत असणाऱ्या सर्व अभंगाचे पुनर्लेखन करण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे तुकारामाचे अभंगाचे तारणहार म्हणून संत संताजी जगनाडे यांना ओळखले जाते. संतानी मानवी कल्याणाचे कार्य, विचार आणि तत्त्वज्ञान पुढच्या पिढीला माहीत व्हावे याकरिता शासनाने चालवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यानिमित्ताने अनेक थोर महात्म्यांची ओळख समाजाला होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनायक लोमटे यांनी मानले.



## संपादकीय....

# नवसंजीवनी मिळणार का?

खासदारकीची शपथ घेतल्यानंतर आता प्रियंका गांधी यांची प्रत्यक्ष राजकीय कारकीर्द सुरू झाली आहे. त्यांच्यामुळे काँग्रेस पक्षास नवसंजीवनी मिळणार का? या प्रश्नाचे उत्तर भविष्यात मिळणारच.

वायनाडहून काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी लाल रंगाचे पुस्तक हातात धरून खासदारकीची शपथ घेत होत्या तेव्हा कितीतरी जणांना त्यांची आजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आठवण झाली. अनेकांना असं वाटू लागलं जणू इंदिरा गांधी याच शपथ घेत आहेत. इंदिरा गांधी यांनी पहिल्यांदा जानेवारी १९६६ मध्ये पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. खरं म्हणजे, घटनेची प्रत सदैव सोबत ठेवण्याची परंपरा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुरू केली आहे. राहुल गांधी प्रत्येक ठिकाणी घटनेची प्रत सोबत ठेवतात. लोकसभा निवडणुकीचा प्रचार असो वा लोकसभेत भाषण करतानाचा क्षण असो, कोणताही राजकीय क्षण असो घटनेची प्रत त्यांच्याजवळ असतेच.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर हल्लाबोल करण्याचं प्रतीक म्हणजे घटनेची प्रत अशी प्रतिमा राहुल गांधी यांनी तयार केली आहे. इंडिया आघाडीला घटनेची रक्षण करणारी संघटना म्हणूनही त्यांनी पुढं आणले आहे. लोकसभेच्या निवडणुकीत आघाडीला याचा खूप फायदा झाला. परंतु हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूक निकालाने भाजपला पुन्हा राज्यांची सत्ता मिळवून दिली. आघाडीची एकजुटता निष्प्रभावी ठरली काय? यासारखे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. लोकसभेतील पराभवातून भाजपने काहीतरी धडा घेतला आणि विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्यावेळी त्याची अंमलबजावणी केली.

महाराष्ट्रात भाजप नेत्यांनी अशी काही रणनीती आखली की घटना बदलण्याचा प्रचार फारसा प्रभाव दाखवू शकला नाही. एवढेच नव्हे तर देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या हातातील लाल पुस्तक हे घटनेची प्रत नसून त्याची तुलना चीनच्या 'माओ त्से तुंग'शी केली आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता सरमा यांनी यापूर्वी राहुल गांधी यांच्या हातातील लाल पुस्तकाचा संबंध चीनच्या राज्यघटनेशी जोडला.

दुसरीकडे, 'द लिटिल रेड बुक' किंवा कम्युनिस्ट चिनी नेते माओ झेडोंग यांचे संपूर्ण शीर्षक कोटेशन्समध्ये माओच्या प्रसिद्ध म्हणींचा संग्रह आहे. यात त्यांच्या प्रसिद्ध विधानाचा समावेश आहे, 'राजकीय शक्ती बंदुकीच्या नळीतून येते.' राजकारणात लाल रंगाचा बहुधा मार्क्सवादी किंवा साम्यवादी विचारसरणीशी संबंध असतो. भाजपने लाल रंगाचे कव्हर असलेले पण आतून कोरे असलेले पुस्तक वाटून राहुल गांधी यांच्या हातातील पुस्तक घटनेची प्रत नव्हे तर कोरे कागद आहेत असा प्रचार केला. ज्या ठिकाणी राहुल गांधी यांची सभा व्हायची तेथे तेथे भाजपकडून ही पुस्तका वाटली जात होती. काँग्रेसने भाजपचा हा डाव उलटून लावण्याचा प्रयत्न केला. मात्र, निवडणुकीत जेवढा फायदा व्हायला हवा होता तेवढा होऊ शकला नाही.

महाराष्ट्र आणि झारखंडसोबतच १४ राज्यांत विधानसभेच्या जागांवर झालेल्या पोटनिवडणुका आणि दोन राज्यांत लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीचा निकालसुद्धा लागला. लोकसभेच्या दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या. केरळच्या वायनाडहून प्रियंका गांधी विजयी झाल्या, तर नांदेडमधून रवींद्र चव्हाण विजयी झाले. अशातच, प्रियंका गांधी यांनी संसदेत खासदारकीची शपथ घेताना हातात घटनेची प्रत ठेवली. नंतर लगेचच प्रियंका गांधी यांनी सत्ताधारी पक्षावर तोफ डागली. भाजपने राज्यघटनेचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आणि शहरी नक्षलवादाशी संबंध असल्याबद्दल भाजपचा हल्लाही फेटाळला. त्यांची लोकसभेतील उपस्थिती पक्षाच्या रणनीतीला नवा आयाम देणार हे निश्चित. गांधी घराण्याची प्रतिष्ठा आणि शैली पाहता प्रियंका गांधी नक्कीच सर्वसामान्यांच्या ह्दयाला स्पर्श करू शकतील. त्यांच्या चेहर्यावरील स्मितहास्यापुढे सत्ताधार्यांचे डावपेच निष्क्रिय ठरल्याशिवाय राहणार नाही.

याच गुणांमुळे प्रियंका गांधी यांच्याकडे त्यांची आजी इंदिरा गांधी म्हणूनही बघितले जाते. इदिरा गांधी यांच्यात शेवटच्या रांगेत उभ्या असलेल्या व्यक्तीशी संपर्क साधण्याची आणि त्यांची दुर्दशा समजून घेण्याची क्षमता होती. इंदिरा गांधींचे ह्दय गरिबांसाठी नेहमीच धडधडत असे. प्रियंका एक नैसर्गिक नेत्या असल्याचे जाणवते. यामुळेच अनेकांना त्यांच्यात इंदिरा गांधींची प्रतिमा दिसते आणि त्यांना घराण्याचा राजकीय वारसा पुढे नेणारा नेता मानतात. नवा अध्याय असा आहे की प्रियंका गांधी आता खासदार आहेत. इंदिरा गांधी यांच्याकडेही हे सर्व गुण होते. धैर्य आणि लोकांमध्ये काम करणे ही त्यांची वैशिष्ट्ये होय. प्रियकांनी शपथविधी सोहळ्यात घातलेली कासवू साडी देखील त्यांच्या आजीच्या आठवणींना उजाळा देणारीच आहे. इंदिरा गांधी यांच्या पोशाखात अनेकदा प्रतिकात्मक संदेश असायचे आणि त्यांच्या कपड्यांचा उद्देश नेहमी लोकांशी संपर्क साधण्याचा असायचा. शपथ घेताना आपल्याला आजी आणि वडील दोघांचीही आठवण येत होती असे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे.

संसदेत पोहोचणे हे प्रियंका गांधी यांच्यासाठी पहिले पाऊल आहे. पुढचा रस्ता लांब आणि अवघड आहे. आजी इंदिरा गांधी यांच्याप्रमाणे प्रियंका गांधी यांना सत्तेचे विशेषाधिकार मिळत नाहीत किंवा त्यांना कोणत्याही सरकारचा पाठिंबा नाही. उलट त्या सत्ताधारी पक्षाकडून टोमणे मारण्याचे आणि शाब्दिक हल्ल्यांचे लक्ष्य बनत आहे. तरीही त्या खंबीर आहे. प्रत्येक हल्ला त्यांनी शिताफीने परतवून लावला आहे. प्रियंका गांधी समर्थकांसाठी आशेचा किरण आणि काँग्रेससाठी नवी ऊर्जा आहे. भाऊ आणि बहीण यांच्यातील अनोखे नाते हे पक्षासाठी एक अतिरिक्त फायदा आहे.

# अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या ईपीएस-९५ पेन्शन वाढीबद्दल सरकारचे मौन का?

कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी.यासाठी अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरू आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दु:ख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.त्यामुळे एनडीए व इंडिया आघाडी यांनी सामंजस्याने एकत्रितपणे निर्णय घेवून सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशनधारकांचा मार्ग मोकळा करून यावर पुर्णविराम लावावा. ईपीएस-९५ पेंशनधारक न्याय मिळेल या आशेवर पेंशन धारकांची आताही उम्मीद टीकुन आहे. म्हणजेच उम्मीद पर दुनिया कायम है लोकसभेत दुनीयाभराचा गोंधळ होतो व सभा तहकूब होते व यावर करोडो रूपयांचा चुराडा होतो.परंतु करोडो पेंशन धारकांबद्दल पक्ष-विपक्ष एकमत होत नाही ही वृध्दाच्या प्रती (सिनियर सिटीझन)च्या प्रती मोठी शोकांतिका आणि दुर्भाग्य म्हणावी लागेल.परंतु आमदार-खासदार आपले पगार व पेंशन वाढीचे विधेयक एका मिनिटात सर्वानुमते पारीत करतात.परंतु ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत, मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते आहे.परंतु पेन्शन धारक आशावादी आहेत त्यामुळे सरकार त्यांना अवश्य न्याय देईल असा पेंशन धारकांना विश्वास आहे. आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा१००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य पक्ष-विपक्ष किंवा सरकारला का दिसत नाही?त्यामुळे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांचा विचार करून कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागू करण्याची घोषणा सरकारने करावी.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर,महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ताबडतोब घ्यावी व ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावावा.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले आहेत. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.त्यामुळे आता सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता चालू असलेल्या अधिवेशनात कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्र्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे याचे संपूर्ण दायित्व पक्ष-विपक्षांचे आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी व पेन्शनसाठी वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू आहे याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. मागील अधिवेशनात सरकारने अनेक विधेयक आणलीत व मंजूर केली. परंतु पेन्शन धारक आपल्या हक्काची लढाई लढत असताना सुध्दा त्यांच्या हाती निराशाच आली. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते.मागील अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली.ईपीएफचा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्र्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सुरू असलेल्या अधिवेशनात ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत.त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे.शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने व पक्ष-विपक्षाने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत. परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दा चालू अधिवेशनात कमी कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे.जय हिंद!

***********

लेखक.
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर).
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ऑस्ट्रेलियाचं स्वागतार्ह पाऊल

मुलांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर कधी यावं हा प्रश्न अनेक पालकांना पडलेला असतो. नेहमीच चर्चेचा आणि वादाचा असलेला हा मुद्दा ऐरणीवर सध्या आला आहे, कारण ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांच्या खालील मुलांना समाजमाध्यम बंदी लागू केली आहे. ही बंदी अमलात यायला अजून वर्ष असलं तरी याबाबतची काही ठोस पावले त्यांनी उचलली आहेत. अर्थात बंदी कशी अमलात आणणार हे अजूनही पुरेसं स्पष्ट झालेलं नसलं तरी ऑनलाइन जगाचे जे 'स्टेकहोल्डर्स' आहेत; ज्यात प्रामुख्याने प्लॅटफॉर्म उभ्या करणाऱ्या कंपन्या आणि देशोदेशीची सरकारं आहेत, यांनी जबाबदारी उचलण्याची वेळ आली आहे हे नक्की.

वयाची पडताळणी कशी करणार?

भारतासह जगभर अनेक मुलं जन्मतारखा बदलून समाजमाध्यमांवर बिनधास्त वावरत असतात. आईवडिलांच्या परवानगीने हा मुद्दा आणायचा म्हटला तर भारतात आईबाबाच मुलांच्या खोट्या जन्मतारखा घालून त्यांना समाजमाध्यम प्रोफाइल्स उघडून देतात हेही वास्तव आहे अशा परिस्थितीत वयाची पडताळणी करणार कशी? मग आपली खासगी कागदपत्रं हा एकच मार्ग उरतो. पण उद्या समजा, भारतात मेटाने वयाच्या पडताळणीसाठी आधार कार्ड वापरा असं म्हटलं तर मेटासारख्या परदेशी कंपनीला आपण आपले आधार कार्ड आणि त्यानिमित्ताने आपली अत्यंत खासगी माहिती देणार का? उद्या, यूट्यूब, ट्विटर आणि तत्सम सगळे प्लॅटफॉर्म्स ही कागदपत्रे मागतील तर ती देण्याची आपली तयारी आहे का? मग यावर पर्याय काय असू शकतो, याचा विचार करणं अत्यंत गरजेचं आहे.

अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया काय करताहेत?

अमेरिकेच्या लेरि म्हणजे चाइल्ड्स ऑनलाइन प्राव्हसी प्रोटेक्शन ॲक्टनुसार समाजमाध्यमांवर १३ वर्षांनंतरच येता येतं. त्याखालील मुलांची प्रोफाइल्स तयार होणार असतील तर ती मोठ्यांनी 'हाताळणं' अपेक्षित आहे. १३ वर्षांच्या नंतर त्याची सूत्रं मुलांकडे येतात आणि त्यांना त्यांची प्रोफाइल्स सार्वजनिक किंवा खासगी जशी हवी तशी ठेवता येतात. भारतातही सध्या हेच नियम लागू आहेत.

चीनने मात्र या संदर्भात वेगळ्या पद्धती आणि नियम राबवले आहेत. अर्थात याचं एक कारण हेही आहे की, त्यांच्याकडे त्यांचे स्वत:चे प्लॅटफॉर्म्स आहेत. त्यांचे स्वत:चे समाजमाध्यम प्लॅटफॉर्म्स, सर्च इंजिन्सपासून सगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे वयाची पडताळणी करायची झाली तर डेटा देशांतर्गत कंपनीतच राहतो. त्यातून त्यांच्याकडे मुळातच इंटरनेट वापरायचं असेल तर खऱ्या नावाने आणि पडताळणी झाल्यावरच वापरता येतं. १८ वर्षांच्या खालच्या मुलांसाठी तिकडे अतिशय कडक कायदे आहेत. १८ वर्षांच्या खालील मुलांना गेमिंग आणि समाजमाध्यम वापरासाठी आठवडाभरासाठी फक्त तीन तास दिले जातात. विकेंड आणि सुट्टीच्या दिवशी एक तास मिळतो. खऱ्या नावाने नोंदणी करणं बंधनकारक आहे. ८ ते १६ वर्षांची मुलं दर महिन्याला जास्तीत जास्त २०० युआन गेमिंग किंवा समाजमाध्यमावर खर्च करू शकतात. तर १६ ते १८ साठी प्रति महिना ४०० युआनची मर्यादा आहे. डौयीन (चायनीज टिकटॉक) सारखे प्लॅटफॉर्म्स वापरावरही निर्बंध आहेत. हे प्लॅटफॉर्म्स १४ वर्षांच्या खालच्या मुलांना रोज फक्त ४० मिनिटं वापरता येतात. आणि या प्लॅटफॉर्म्सवर टीन किंवा युथ मोड असा पर्याय असतो.

ऑस्ट्रेलियाच्या ऑनलाइन सेफ्टी अमेंडमेंट बिलामध्ये अजून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होणे बाकी आहे. मुळात वयाची पडताळणी कशी केली जाणार हा सगळ्यात कळीचा मुद्दा आहे. त्याबाबत ऑस्ट्रेलियन सरकारने अजून काही भाष्य केलेले नाही. पण ई-व्हेरिफिकेशनशिवाय दुसरा पर्याय नाही असं आता तरी मानलं जातंय.

सगळं युद्ध डेटाचं

एक गोष्ट इथे लक्षात घेणं आवश्यक आहे ती म्हणजे, जगभर सगळीकडे आणि सगळ्या कंपन्यांची सगळी धडपड जास्तीत जास्त डेटा गोळा करण्याची सुरू आहे. आणि हा डेटा कुणाचा, तर प्रामुख्याने मुलांचा. जेन झी, जेन अल्फा आणि त्यामागून येणारे जेन बीटा या पिढ्यांच्या डेटाकडे सगळ्यांचं लक्ष लागून आहे. कारण या तिन्ही पिढ्या वर्तमान आणि भविष्याच्या इंटरनेटच्या प्रमुख ग्राहक आहेत. या मुलांच्या डेटामुळे जगभरात बऱ्याच गोष्टी बदलत आहेत, बदलणार आहेत. ही मुलं काय विचार करतात, काय विचार करू शकतात, कशाच्या प्रभावाखाली येतात, कशाच्या येऊ शकत नाहीत, काय केलं म्हणजे या मुलांना एखादी गोष्ट पटवून देणं शक्य होऊ शकतं इथपासून ते या तिन्ही पिढ्यांना ग्राहक म्हणून 'तयार' करणं या डेटाच्या भरवशावरच तमाम कंपन्यांना शक्य आहे. त्याला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड आहे.

मेटा आणि गूगलसारख्या अवाढव्य कंपन्यांना ऑस्ट्रेलियामध्ये आणि त्यांच्या कायद्यांमुळे फार भयंकर धोका आहे अशातला भाग



नाही कारण इथे त्यांचा 'युजर बेस' बेताचा आहे. पण ऑस्ट्रेलियाने जी सुरुवात केली आहे त्याचं वारं जर जगभर पसरलं आणि विशेषत: प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये पसरलं तर हा या कंपन्यांच्या मुळावर घाव आहे. भारतासारख्या देशात जिथे मेटा, मायक्रोसॉफ्ट, एक्स आणि गूगलचा सर्वाधिक ग्राहकवर्ग आहे, तिथे जर असे निर्बंध आले तर ग्राहकवर्ग कमी होण्याबरोबरच भविष्यातल्या ग्राहकवर्गाचा डेटा गोळा करणं आणि त्याचे विश्लेषण करून व्यावसायिक धोरणं आखणं (जरी भारतासह जगभरातले तरुण मोठ्या प्रमाणावर पायरेटेड आणि विकत घेऊनही व्हीपीएन वापरायला लागले असले तरीही) या सगळ्यामध्ये प्रचंड अडथळे तयार होऊ शकतात. शिवाय जगातल्या या बलाढ्य कंपन्यांकडे चिनी माणसांचा म्हणजे जगाच्या लोकसंख्येतल्या १.४४ बिलियन लोकांचा डेटा नाही. पण जगभरातल्या अनेक मोठ्या गेमिंग आणि समाजमाध्यम प्लॅटफॉर्म्समध्ये चिनी गुंतवणूक आहे. उदा. द्यायचं झालं तर रोब्लोक्स ही कंपनी, ज्यांचे अनेक गेम्स मुलांमध्ये अतिशय प्रसिद्ध आहेत त्यात मोठी चिनी गुंतवणूक आहे. त्यामुळे लहान मुलांची काळजी हा मुद्दा वरकरणी दिसत असला, तो महत्त्वाचा असला तरीही मुलांच्या आणि तरुणांच्या डेटाचं जे युद्ध सुरू आहे त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

जबाबदारी कुणाची?

समाजमाध्यम आणि गेमिंग प्लॅटफॉर्म्सचे अनेक दुष्परिणाम गेल्या काही वर्षांत ठळकपणे पुढे आले आहेत. इंटरनेटचं व्यसन हा गंभीर प्रश्न आहे. 'ब्रेनरॉट' हा शब्द आताच ऑक्सफर्ड डिक्शनरीने अधिकृत शब्द म्हणून स्वीकारला आहे. अति स्क्रीन टाइममुळे जगभर ऑटिझम वाढतोय का यावर संशोधनं सुरू आहेत. मुलांच्या संदर्भात घडणारे सायबर गुन्हे वाढत आहेत. या सगळ्या गदारोळात मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत काहीतरी ठोस पावलं उचलली जाणं आवश्यक आहे.

जसं रस्त्यावर गाडी चालवण्याचं, दारू पिण्याचं, लग्न करण्याचं एक वय कायद्याच्या चौकटीत मान्य केलेलं असतं त्यामागे काही कारणं असतात. त्याचप्रमाणे इंटरनेटचा वापर मुलांनी कधीपासून सुरू करावा, त्या इंटरनेटवरच्या वेगवेगळ्या उत्पादनांचा वापर करण्याचं वय कुठलं याबाबतही ठळक नियम आणि मार्गदर्शन असणं आवश्यक आहे. इंटरनेट मुलांना उपलब्ध असणं हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे, पण त्यावरची कुठली उत्पादने त्यांनी वापरावीत हे वयानुरूपच असलं पाहिजे. या सगळ्या बाबतीतले नियम तोडले जातात हे जरी खरं असलं तरी नियम तोडले जातात म्हणून नियमच न लावणं शहाणपणाचं ठरू शकत नाही. त्या दृष्टीनेही ऑस्ट्रेलियाने घेतलेला निर्णय किंवा चीनचे प्रयत्न ही महत्त्वाची सुरुवात मानली पाहिजे. हा निर्णय राबवायचा कसा हा मोठा प्रश्न असला तरीही मुलांच्या सुरक्षेची आणि मनोसामाजिक स्वास्थ्याची जबाबदारी प्लॅटफॉर्म्स, सरकारं आणि पालक यांना उचलावीत लागणार आहे. नव्हे, त्यांनी ती उचललीच पाहिजे. मुलांच्या समाजमाध्यम वापराबाबत काही ठळक नियम असणं ही स्वागतार्ह सुरुवात आहे.

# द्वेषाचे चक्रव्युह भेदुन अखेर देवेंद्र पुन्हा आले..! महाराष्ट्राला प्रगतीपथावर घेवुन जाणार हाच माझा संकल्प – मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर सरलेल्या ०५ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईस्थित आझाद मैदानावर राज्याचे ३१वे मुख्यमंत्री म्हणुन देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांनी शपथ घेतली आणि एका नविन युगाचा प्रारंभ झाला. तिसर्यांदा मुख्यमंत्री म्हणुन शपथ घेताना ज्या मैदानावर सुमारे ४१ वर्षांपुर्वी पक्षाचे अधिवेशन झाले होते. तिथे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांनी 'अँधेरा छटेगा, कमल खिलेगा' हा आत्मविश्वास कार्यकर्त्यांमध्ये संबोधनाद्वारे भरला होता. त्यांचेच वारसदार असलेले विद्यमान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या उपस्थितीत देवेंद्रजींचा शपथविधी हा सुवर्णयोग म्हणावा लागेल. ऐतिहासिक आणि अभूतपुर्व शपथविधी नयनी पहाताना आयुष्य झिजवणार्या पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या खडतर परिश्रमाचे यश किती छान..? हा प्रत्यय येवुन गेला. बहुमताचं फुललेले कमळ ज्या पाकळ्यांनी राजकिय अंध:कार दुर करून टाकला. मंत्रालयाच्या दरवाजात पहिला पाऊल टाकताना मुख्यमंत्री म्हणुन त्यांनी पुण्याच्या एका गरिब कुटुंबियांना वैद्यकिय सहाय्यता निधीद्वारे पाच लाखाच्या चेकवर केलेली सही त्यातुन नेतृत्वाची संवेदनशीलता प्रकट झाली. केवळ विकासाचं राजकारण करणारा चेहरा म्हणुन ज्यांची ओळख त्यांच्या दुरदृष्टीला नदीजोड प्रकल्प, दुष्काळमुक्त महाराष्ट्र एवढेच नव्हे तर सिंचन त्यासाठी ग्रीन एनर्जीचं स्वप्न यापेक्षाही अधिक राज्य चालवताना समाजामधील सर्व घटक समावेशक अर्थात वंचित, उपेक्षित, दीनदलित, शेतकरी, कष्टकरी, सुशिक्षित बेकार, मजुर, सामान्य माणुस एवढेच काय..? पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी घालुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अंत्योदय त्यातच शेवटच्या माणसाचं कल्याण साध्य करण्याचा संकल्प घेवूनच त्यांनी मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर आसनस्थ झाले. माध्यमप्रमुख नवनाथ बन यांनी घेतलेल्या मुलाखतीचा अनुवाद प्रिंट मिडियासाठी करण्याचा आम्ही केलेला खटाटोप.

प्रश्न –मुंबईस्थीत आझाद मैदानावर सुर्यास्त समयी राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणुन शपथ घेताना ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार उसळलेल्या समुद्राच्या लाटांप्रमाणे जमलेली अभूतपुर्व गर्दी त्यातला जनसागर पाहिल्यानंतर आपल्या मनात काय भाव उमटले..?

उत्तर – त्या क्षणाचे वर्णन करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीतच. पण सर्वांना आनंद वाटावा असा सोहळा होता. वास्तविक पहाता राजकिय क्षेत्रात प्रवेश करताना सत्तापदाचे एवढे स्वप्न कधीच पाहिले नव्हते. संघ परिवार आणि पक्षाच्या विचाराने प्रेरित होवुन राष्ट्र धर्म आणि भारतमातेची सेवा करावी त्याच प्रवाहात असताना नियत अर्थात परमेश्वराची साथ आणि पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, अमितभाई शहा, राष्ट्रीय अध्यक्ष नड्डाजी एवढेच नाही तर माझे सहकारी पक्षाचे, विचाराचे तमाम कार्यकर्ते या सर्वांच्या आशिर्वादाने मला तिसर्यांदा संधी मिळाली माझं भाग्य. अर्थात पदाचा आनंद त्यापेक्षा जबाबदारी वाढली या कर्तव्याची जाणिव. राज्य प्रगतीच्या दिशेने जाताना आनंद साजरा करत बसण्यापेक्षा जनादेशाचा सन्मान करीत जनसेवेसाठी समर्पण करण्याची वेळ माझ्यासह पक्षाच्या कार्यकर्त्यांवर येवुन ठेपली. मोठ्या आनंदाने लोकसेवेला प्रारंभ आम्ही सारे कार्यकर्ते करणार.

प्रश्न – महाराष्ट्र आता थांबणार नाही..?

उत्तर – हे खरं आहे की, अडीच वर्षापुर्वी मविआ सरकार उखडुन टाकताना माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करून राज्य विकासाला गती दिली. दरम्यान अजितदादा पवार आमच्यासोबत आले. यापुर्वी २०१४ ला मुख्यमंत्री म्हणुन काम करताना अनुभवाची शिदोरी माझ्यासोबत होती. त्या काळात आम्ही सुरू केलेल्या प्रकल्पाला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर स्थगिती दिली होती. त्यामुळे विकासाच्या गाडीला ब्रेक बसला होता. मात्र महायुतीचं सरकार आल्यानंतर आम्ही अर्धवट राहिलेले इन्फ्राटेकचे सर्व प्रकल्प मार्गी लावुन घेतले. जनतेसाठी काम आम्ही करतो हा विश्वास लोकांना पटला. जुने प्रकल्प पुर्ण करताना नविन योजना पुर्णत्वाकडे नेल्या. नदी जोड हा प्रकल्प माझे व्हिजन असुन नविन चार नद्या जोड प्रकल्पाला आम्हीच मान्यता दिली. येत्या पाच वर्षात चार नद्या जोडल्या तर खर्या अर्थाने महाराष्ट्र दुष्काळ मुक्तीकडे जावु शकतो.

प्रश्न – ग्रीन एनर्जी आपला महत्वाकांक्षी प्रकल्प..? इन्फ्रामॅन अशी तुमची ओळख, मुंबईचा चेहरा तुम्ही बदलुन टाकला. पुढच्या पाच वर्षांत महाराष्ट्र कुठे असेल..?

उत्तर – मुंबईसाठी २०१६ मध्ये पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली घोषणा झाली होती, मुंबईच्या एमएमआर रिजनच्या कोणत्याही भागातुन कुठेही जाण्यासाठी एक तासापेक्षा कमी वेळ लागला पाहिजे. त्यामागे दुरदृष्टी दळणवळणाची झेप निश्चित होती. अत्याधुनिक वाहतुक रचना आम्हाला करणे गरजेचे वाटले. त्यानुसार मुंबईमध्ये कोस्टल रोड तयार झाला. वरळी–बांद्रा सिलिंक, बांद्रा–वर्सोवा सिलिंक कामही पुर्ण झाले. वर्सोवा–मड या कामाचे टेंडर निघाले. मड ते विरारपर्यंतचा नवा सिलिंक तयार आम्ही करणार. एवढेच नाही तर मी, जेव्हा जपानला गेलो त्या सरकारकडून प्रकल्पासाठी ४० हजार कोटी रूपये देण्याचे मान्य करून घेतले. काम देखील लवकरच चालु होईल. मुळात महानगराचा विकास खरं तर त्या शहराच्या वाहतुक यंत्रणेवर बराच अवलंबुन असतो. कमी वेळेत अधिक काम झाले पाहिजे. सध्या मुंबईची ६० टक्के ट्रॅफिक ही वेस्टर्न एक्सप्रेस वेवरून पुर्ण कंजेस्टेड होवुन जाईल. विरार–अलीबाग कॉरीडॉरचे काम सुरू आहे. अटल सेतु तयार झाल्यामुळे नवी मुंबई ते मुंबईमधील अंतर २२ किमीने कमी झाले. ३७५ किमी मेट्रो नेटवर्क तयार होत आहे. ही सर्व कामे जेव्हा १०० टक्के पुर्ण होतील वाहतुक वेळ वाचेल आणि त्याचा उपयोग राज्य विकासाला होवु शकतो.

प्रश्न – मुंबईत मराठी माणसाला आपले हक्काचे घर मिळवण्यासाठी होणारा त्रास त्याचं काय..?

उत्तर – हे खरं आहे की, मराठी माणसाला शहरात घर मिळालेच पाहिजे यात शंका नाही. त्याकरिता बीबीडी चाळ, अभ्युदय नगरसारख्या योजना असतील. सेल्फ रिडेवलपमेंटसाठी आम्ही गृहनिर्माण संस्थांना सहकार्य करणार ज्यामुळे जमिनी बिल्डरांच्या घशात जाणार नाहीत. रिडेवलपमेंटच्या सतरा मागण्या आम्ही मान्य केल्या. शिवाय मुंबई जिल्हा बँकेच्या माध्यमातुन प्रविण दरेकर यांनी घरासाठी योजना सुरू केली. सोळा बिल्डिंग आजवर तयार झाल्या आहेत. एकुण १४०० बिल्डिंगचा प्रस्ताव ध्यानात असुन ही लँड लॉक सिटी असल्याने गृहनिर्माण प्रकल्पाला मर्यादा येते. म्हणुनच आम्ही नविन रस्त्याचे जाळे निर्माण करत असताना मुंबईप्रमाणेच आणखी तीनपट मोठी मुंबई करण्याचा मानस असुन ते अटल सेतुमुळे शक्य होत आहे. विस्तारित भागात मराठी माणसाला घर देणे सोपे होणारच.

प्रश्न – धारावी प्रकल्पावरून विरोधकांची ओरड चालु असते, त्याचे काय..?

उत्तर – हे खरं आहे की, या प्रकल्पाची संकल्पना स्व.राजीव गांधींच्या काळात मांडली. तदनंतर अनेक सरकारे त्यांच्याच विचाराची आली. मात्र कुणीच लक्ष्य दिलं नाही. २०१४ नंतर मीच मुख्यमंत्री असताना या प्रकल्पाचा डिपीआर तयार केला. त्यासाठी रेल्वेची अधिकची जागा खरेदी केली. विकासक नियुक्त करून प्रकल्प पुढे घेवुन जातानाच २०१९ मध्ये ठाकरे सरकारनं सत्तेवर येताच प्रकल्प थांबवला. खरं तर त्या काळात अदानीकडे प्रकल्प नव्हता. मात्र ठाकरेंनी काढलेले टेंडर रद्द केले. नवे नियम आणि अटी लावुन दुसरे टेंडर काढले. त्यांचेच टेंडर आम्ही सत्तेत आल्यानंतर कायम ठेवले. नॉर्थ वर्डस वापरण्याऐवजी साऊथ वर्डस वापरण्याची मी परवानगी दिली ज्यामुळे विकासाची टिडिआरची मोनोपोली रहाणार नाही. डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला. पारदर्शक आणि गुणवत्तेच्या आधारावर प्रकल्पाला प्राधान्य द्यायचे ठरल्यानंतर अदानी समुहाला काम मिळाले. जे पात्र आहेत त्यांना घरे मिळेल. ज्यांना नियमात बसता येत नाही, त्यांच्या करिता रेंटल हाऊसिंग पर्याय आम्ही ठेवला आहे, ज्यामुळे आज ना उद्या त्यांना घर मिळेल.

प्रश्न –राज्याचे व्हिजन..?

उत्तर – मुख्यमंत्री म्हणुन कारभार करताना सबका साथ, सबका विकास महायुतीचे सर्व घटक पक्षांना सोबत घेवुन समाजातील वंचित, उपेक्षित, गरजु लोकांना न्याय मिळवुन देणार. शेतकरी, कष्टकरी, सुशिक्षित बेरोजगार, महिला कल्याण एवढेच नव्हे तर रस्ते विकास, दळणवळण, सिंचन, मुलभुत पायाभुत सुविधा ज्यातुन ग्रामविकास, सामान्य माणसाच्या कल्याणासाठी जास्तीचा वेळ देताना हे राज्य प्रगतीकडे घेवुन आम्ही जाणारच. दोन्हीही उपमुख्यमंत्री यांच्या सहकार्याने प्रगतीचे पाऊल पुढते रहाणार यात शंका नाही. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक प्रशासन आणि निवडणुक काळात जाहिरनामाद्वारे दिलेल्या वचनाची पुर्तता केल्याशिवाय रहाणार नाहीत. ग्रामविकास हा देखील आमचा शहरासोबतच अजिंडा आहे.

प्रश्न – तुम्ही बहुमताने सत्तेवर आलात तरी विरोधकांनी ईव्हीएमचा नावाच्या शंकाने घेत ओरडायला चालु केले, काय सांगाल..?



उत्तर – स्पष्ट सांगायचं म्हटलं तर हा १०० टक्के मुर्खपणा म्हणावा लागेल. पराभवाचे आत्मचिंतन करण्यापेक्षा विजय सहन होईना म्हणुन नको त्या गोष्टीचे खुपसट काढून जनतेची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला जातोय. झारखंड आणि राज्यात एकाच वेळी निवडणुका झाल्या. तिथे विरोधक सत्तेवर आले. आम्ही इथे आलो. एवढेच काय राज्यात देखील लातुरसारख्या शहरात काँग्रेसचा विजय आणि ग्रामीण भागात भाजपचा विजय, नांदेड लोकसभेत काँग्रेसचा विजय आणि विधानसभेत महायुतीचा. एक सांगा, ईव्हीएमचा दोष असता तर मग असे निकाल आले असते का..? राहुल गांधीनींच आत्मपरीक्षण करून घेतलं तर खर्या अर्थाने बरं होईल.

प्रश्न – तुमच्याविषयी विरोधकांनी नाही त्या शब्दांत आरोप–प्रत्यारोप केले. अगदी कुटुंबापर्यंत विरोधकांनी तोंडसुख घेतलं, त्यात काही जणांनी स्वत:ची लायकी सोडून देखील अपशब्द वापरले, आता तुम्ही याकडे कसं पहाणार..?

उत्तर – खरं तर मी विरोधकांचे आभारच मानतो. त्यांनी माझा सतत द्वेष केल्यामुळे सामान्य जनतेच्या मनात माझ्याबद्दल सहानुभुती वाढली. विरोधक, सोशल मिडियावरील त्यांचे ट्रोलर अत्यंत असभ्य भाषेत मला व माझ्या कुटुंबियांना यांनी बदनाम केलं. त्याचा मानसिक त्रास थोडा झाला मात्र जनतेच्या मनात माझ्याविषयी चांगली जागा मिळाली. बदनामीची निराशा न येता विरोधकांच्या सोबत लढण्याची जिद्द आणि प्रेरणा मिळाली. त्यांना हारवूनच मी अपमानाचा बदला घेतला. त्यामुळे मला कुणाच्याविषयी किंचितही आसुया राहिली नाही. सुडाभावाचं तर राजकारण आयुष्यात मी केलंच नाही.

प्रश्न – तीन पक्षाची महायुती, सरकार चालवताना तारेवरची कसरत..?

उत्तर – अडीच वर्षाचा झालेला सराव सकारात्मक आणि आमच्यातला एकसंघ भाव एकनाथराव, अजितदादा आमची अंतर्मनाची एकरूपता त्यामुळे हे राज्य एकसंघ पुढे घेवुन जाण्यासाठी रात्रीचा दिवस आम्ही करवुन दाखवु. मंत्रीमंडळातील सहकारी सर्व आमदार आणि संघटनात्मक मान्यवर पदाधिकारी विकासाच्या प्रक्रियेत सर्वांनाच सोबत घेवुन जाताना सबका साथ, सबका विकास हेच आमचं सुत्र.

प्रश्न – राज ठाकरे लोकसभेच्या वेळी सोबत होते, विधानसभेला सोबत राहिले नाहीत. पुन्हा जवळीक..?

उत्तर – हे खरं आहे की, राज ठाकरेंच्या मनसेने मनाचा मोठेपणा दाखवून लोकसभा निवडणुकीत पाठिंबा दिला. त्याचा फायदाही आम्हाला झाला. विधानसभा निवडणुकीत आम्ही तीन पक्ष एकत्र संभाव्य राजकिय परिस्थिती एकत्र येण्यासारखी राहिली नाही. राज ठाकरे ज्यांचा स्वत:चा एक मोठा पक्ष आहे. विधानसभेची निवडणुक लढवणे त्यांनाही अनिवार्य होते. त्यांच्या अनेक उमेदवारांचा पराभव झाला असला तरी मतदान चांगले पडले. त्यांच्या पक्षाचे विचार आमच्याशी जुळतात. त्यामुळे भविष्यात त्यांना आमच्यासोबत ठेवण्यात आनंदच रहाणार. महानगरपालिका, नगरपरिषदेत शक्य तिथे सोबत ठेवणारच.

प्रश्न – लाडक्या बहिणीचं काय..?

उत्तर – महायुतीचं सरकार बहुमताच्या विजयात राज्यातील माता–भगिनी अर्थात लाडक्या बहिणींचा फार मोठा सिंहाचा वाटा हे आम्ही नाकारू शकत नाही. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आम्ही चालु केल्यानंतर विरोधकांनी प्रचंड विरोध योजनेलाच केला. काँग्रेससह अनेकजण योजना रद्द करण्यासाठी कोर्टात गेले. पण, आम्ही महिला कल्याणासाठी म्हणुन योजना सुरू केली. निवडणुकीच्या अगोदर आम्ही त्यांना वचनाप्रमाणे हाप्ते मिळवुन दिले. योजना कधीच बंद होवू देणार नाही. महिलांच्यासाठी या राज्यात यापेक्षाही अधिक वेगवेगळ्या स्तरावर चांगले निर्णय आम्ही घेणारच. ज्यांनी विरोध केला तेच विरोधक आता पराभूत झाल्यानंतर योजनेचा हाप्ता वाढविण्याची मागणी करतात हे हास्यास्पद असुन आता आमचं सरकार सक्षम आहे. विरोधकांच्या सल्ल्याची गरज भासणार नाही. लाडक्या बहिणींमुळे बहुमताने महायुती सत्तेत आली त्याबद्दल राज्यातील तमाम माता–भगिनींचे आभार मानावे तेवढे कमीच. विरोधकांनी विकासाच्या प्रश्नावर विरोध न करता सकारात्मक भुमिका घेतली तर प्रगतीच्या मार्गावर अडथळे निर्माण होणार नाहीत एवढेच सांगतो.

**********


मुख्यमंत्र्यांची सडेतोड मुलाखत – राम कुलकर्णी*
(भाजपा प्रदेश प्रवक्ता) मो.९४२२७४२५७७

# हात–पाय गमावलेल्यांना मिळणार मोफत हात–पाय! बीडमध्ये २२ डिसेंबरला मोफत वाटप

बीड :– देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त बीड येथे २२ व २३ डिसेंबरला मोफत कृत्रिम हात व पाय वाटप आणि नेत्ररोग शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती रामदास कुंभार यांनी दिली. देशभक्त पद्मश्री रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृतीदिनामित्त कुंभार समाज विकास संस्था, बीड. व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर होत आहे. हात व पाय गमावलेल्या दिव्यांग बांधवांसाठी अद्यावत टेक्नॉलॉजीव्दारे व उच्च दर्जाच्या फायबरपासून बनविलेले







तसेच अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय यांचे मोफत वाटप या शिबिरात होणार आहे. २२ डिसेंबर रोजी केले आहे. शिबिराच्या दिवशी पायाची व हाताची मापे घेतली जातील. माप घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसानंतर अवयव वितरण केले जाणार आहे. हे कृत्रिम हात व पाय लावल्यानंतर मनुष्य चालू शकतो, सर्व दैनंदिन कामे करु शकतो. जिनासुध्दा चढू शकतो, सायकल सुध्दा चालवू शकतो. तरी गरजूंनी व त्यांच्या नातेवाईकांनी २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी काँग्रेस भवनासमोर, बार्शी नाका रोड, बीड येथे उपस्थित राहावे. तसेच कुंभार समाज विकास संस्था, बीड व श्री. आनंदऋषीजी हॉस्पीटल, मेडिकल रिसर्च सेंटर अहिल्यानगर (अहमदनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने २३ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत बीड येथील हॉटेल ग्रँड यशोदा येथे मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे. या दोन्ही शिबिरांसाठी नाव नोंदणी आवश्यक असून त्यासाठी रामदास कुंभार ९८६०५७२३८३ व चनबस वायकर ९८२२४८१३८२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# राज्यातील बांधकाम कामगारांचा १८ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर विधानसभेवर प्रचंड मोर्चा.

पुणे / प्रतिनिधी :– शनिवार दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी राज्यातील बांधकाम कामगारांचा भव्य मेळावा निळू फुले कला मंदिर राष्ट्रसेवा केंद्र सभागृह पुणे येथे घेण्यात आला या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कॉमेडी.शंकर पुजारी हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक सागर तायडे,विनिता बाळेकुंद्री,राजकुमार होळीकर,आनंद भालेराव,प्रशांत मेश्राम,उस्मान शेख,प्रशांत रामटेके,काशीनाथ निखाते,मनीष गौरखेडे,रत्नदीप डोफे, राजेंद्र सुतार,शैलजा अर्नाळकर,विशाल बडवे,प्रदीप परकाले,राहुल नगराळे,उमेश कांबळे,सुनील ठोबे,नितीन वाकोडे,सिद्धार्थ बोरडे,अंकुश मूजेवार,आशीष मेश्राम इत्यादी विविध कामगार संघटनेचे मान्यवर प्रमुख पदाधिकारी यांनी कामगारांना मार्गदर्शन केले.राज्यातील ३०० पेक्षा जास्त १३९ कामगार संघटनांचे प्रतिनिधी या मेळाव्यास उपस्थित होते.प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर तायडे यांनी केले तर आभार सुनिल ढोबे यांनी मानले.

बांधकाम कामगारांचे सर्व ऑनलाईन कामकाज त्वरित सुरू होण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्यातील ५४ लाख ३६ हजार बांधकाम कामगारांना न्याय हक्क अधिकार मिळवून घेण्याकरिता प्रचंड मोर्चा आयोजीत करण्याचा ठराव मांडण्यात आला.यातील एक दोन टक्के बांधकाम कामगार उपस्थितीत राहिले तर राजकीय हुकुमशाही, एकाधिकार शाही मोडून काढली जाईल.असे सागर तायडे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले.जात,धर्म,पंथ आणि पक्ष विसरून असंघटित कष्टकरी कामगारांनी प्रचंड मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.मेळाव्यात एकूण १० ठराव मांडण्यात आले. ठराव क्रमांक १) महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पूर्ववत सर्व पोर्टल काम सुरू करणे बाबत. ठराव क्रमांक २) कामगार मंत्री श्री.सुरेश खाडे यांनी जाहीर केल्यानुसार ५४ लाख बांधकाम कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपये सानुग्रह अनुदान त्वरित मिळण्याबाबत.ठराव क्रमांक ३) बांधकाम कामगारांचे सर्व २६ लाख प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करण्याबाबत.ठराव क्रमांक ४) मंडळाचे खासगीकरण बंद करा.ठराव क्रमांक ५ ) मंडळाने कायम स्वरुपी कर्मचारी नेमावे. त्यात नोंदणी कृत कामगारांच्या सुशिक्षित मुलांना उत्तीर्ण व १२ वी उत्तीर्ण मुलांना प्रधान देण्यात यावे.ठराव क्रमांक ६) नोंदणीकृत कामगार संघटनाना प्रधान देऊन विश्वासात घेऊन नांव नोंदणी, नूतनीकरण,कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.ठराव क्रमांक ७) बांधकाम कामगार संघटनानी कृती समिती चे रीतसर सभासद व्हावे. आणि वार्षिक वर्गणी भरावी.ठराव क्रमांक ८) बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीची कार्यकारणी निवड करण्यात यावी.ठराव क्रमांक ९) बांधकाम कामगार कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होण्यासाठी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात यावी.ठराव क्रमांक १०) नागपूर हिवाळी विधानसभेवर लक्षवेधी प्रचंड मोर्चा काढण्याबाबत.या ठराव नुसार बांधकाम कामगारांचा १८ डिसेंबर २०२४ रोजी प्रचंड मोर्चा नेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

मागील सहा महिन्यांमध्ये चार बड्या कंत्राटदारांना या महामंडळाकडून १५००० कोटी रुपये वादग्रस्त योजनेवर खर्च करण्यात आलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या मंडळातील अधिकाऱ्यांच्या विरोधी व शासन विरोधी असंतोष वाढत चाललेला आहे. मुंबई उच्च न्यायालयामार्फत ६ डिसेंबर रोजी महाराष्ट्र शासन व या मंडळास असा आदेश करण्यात आलेला आहे की आचारसंहितेच्या नावाखाली बंद करण्यात आलेले बांधकाम कामगारांचे सर्व कामकाज एका दिवसात सुरू करण्यात यावे. परंतु या आदेशाची अंमलबजावणी करतोय असं सांगून प्रत्यक्षात पोर्टल वर माहिती दिली जाते.मात्र सर्व प्रकारचे काम बंद केले आहे. महाराष्ट्रामधील २६ लाख नोंदीत बांधकाम कामगारांना कसलाही लाभाचा अर्ज मंडळाकडे सध्या करता येत नाही.ते पोर्टलस त्यानी बंद ठेवलेले आहेत.इतकेच नव्हे तर कामगारांची नवीन नोंदणी व नुतनीकरण करणे बाबतीमध्ये जे तालुका कामगार सुलभ केंद्रे सुरू करण्यात आलेले आहेत ते अत्यंत आकार्यक्षम असून त्यामधून कामगारांचे कोणतेच काम होत नाही असं चित्र आहे. इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळ स्थापन झले तेव्हा पासून कायमस्वरूपी कर्मचारी मंडळाने नियुक्त केले नाही,प्रभारी आणि कंत्राटी कामगारांच्या मार्फत सर्व कामकाज चालते असे राजकुमार होळीकर यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाने ९ सप्टेंबर २०१४ रोजी काढलेल्या आदेशानुसार



सर्व बांधकाम कामगारांची प्रलंबित कामे एका महिन्यात निकाली काढावीत असा आदेश आहे.परंतु हा आदेश धाब्यावर बसवून आज महाराष्ट्रामध्ये दोन दोन वर्षापासून सर्व लाभाचे अर्ज प्रलंबित आहेत.एखाद्या कामगारांचा मृत्यू झाला तरी तिच्या विधवा महिलेस अंत्यविधीसाठी मिळणारे रक्कम दोन दोन वर्षे झाली तरी मिळत नाही. इतर कल्याणकारी योजनाचा लाभ तर मिळत नाही.म्हणूनच सर्व २६ लाख प्रलंबित अर्ज ताबडतोब महाराष्ट्र शासनाने मंजूर झाल्याचे घोषित करून त्याच्याबद्दलची पूर्तता करून घेणे आवश्यक आहे.असे शंकर पुजारी यांनी सांगितले.मध्यान भोजन कोणासाठी होते त्याची अभ्यासपूर्ण माहिती आनंद भालेराव यांनी मांडली. बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी आणि उपचारांच्या नांवावर कशी निधी लुटल्या जाते यांची माहिती प्रशांत मेश्राम यांनी मांडली.बांधकाम कामगारांच्या विविध समस्या आणि त्यावरील उपाय यावर मेळाव्यात अनेकांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.शेवटी या सर्व मागण्यांच्यासाठी १८ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर हिवाळी विधानसभेवर महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांचा प्रचंड मोर्चा काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला अशी घोषणा शंकर पुजारी यांनी केली. करीत मोर्चास बांधकाम कामगारांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे असे आवाहन करणारे पत्रक महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना कृती समितीचे निमंत्रक कॉ.शंकर पुजारी यानी प्रसिद्धस दिलेले आहे.

# लातूर जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार पुन्हा आक्रमक

लातूर / प्रतिनिधी :- लातूर जिल्हा रूग्णालय जागा हस्तांतरण शासन आदेश १९ जून २०२४ यानुसार १८ ऑगस्ट २०२४ पर्यंत म्हणजेच ६० दिवसांच्या आत ही प्रक्रिया पूर्ण होणे बंधनकारक होते मात्र हा अवधी संपून आज ११३ दिवस उलटले आहेत. सरकार जरी नवे असले तरी माझं लातूर परिवाराने ज्यांच्याकडे पाठपुरावा केला आहे ते सर्व सन्माननीय नेते, आमदार, मंत्री याही सरकारचा भाग राहणार आहेत. आतातरी या सामाजिक विषयास न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. आजपासून पुन्हा एकदा हा प्रश्न निकाली काढण्यासाठी माझं लातूर परिवार मैदानात उतरत आहे. मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत लातूर जिल्हा रूग्णालय हा बहुचर्चित आणि प्रलंबित विषय मार्गी लागेल हा विश्वास आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी ज्यांना हा विषय जवळपास तोंडपाठ झाला असेल. आता ती वेळ आली आहे. सर्व शासकीय, प्रशासकीय सोपस्कार पूर्ण झालेली आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना देखील वेळोवेळी या विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देण्यात माझं लातूर यशस्वी ठरले आहे. जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी एकत्रित येऊन जिल्हा रूग्णालय पदरात पाडून घ्यावे असे आवाहन परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. आता यापुढील काळात माझं लातूर परिवार गाफील राहणार नाही हे लक्षात ठेवावे. गेल्या १४ महिन्यांपासून संवेधानिक मार्गाने सुरू असलेला हा लढा आता अधिक आक्रमक आणि तीव्र करण्यात येईल अशी माहिती माझं लातूरने दिली आहे.

जिल्हा रुग्णालय आंदोलनावर दृष्टिक्षेप

२ ऑक्टोबर २०२३ पासून बेमुदत साखळी उपोषणाने प्रश्न ऐरणीवर.







शासनाने १ महिन्यात विषय मार्गी लागेल असे आश्वासन दिले होते.

आमदार संभाजी पाटील निलंगेकर
- ४ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती,

आमदार अभिमन्यू पवार
- ४ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती,

आमदार अमित देशमुख
- ३ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती,

तत्कालीन मंत्री संजय बनसोडे
- मंत्रालयात भेट, लातूरात ३ वेळा भेट, निवेदन, विनंती,

आमदार रमेश कराड
- डीपीडीसी बैठकीत विषय मांडावा म्हणून निवेदन सादर,

तत्कालीन पालकमंत्री गिरीष महाजन
- मंत्रालयात भेट, ३ वेळा लातूरात भेट, निवेदन, विनंती,

तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- मंत्रालयात भेट, निवेदन, विनंती,

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार
- ३ वेळा प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर, विनंती,

तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजी सावंत
- मुंबई निवासस्थानी प्रत्यक्ष भेट,निवेदन, विनंती,

तत्कालीन मंत्री उदय सामंत
- लातूर येथे प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती,

माजी मंत्री दिलीपराव देशमुख
- ३ वेळा प्रत्यक्ष भेट, निवेदन, विनंती,

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
- वर्षा बंगल्यावर प्रत्यक्ष भेट, लातूर येथे ३ वेळा भेट, निवेदन, विनंती,

तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे
- ३ वेळा फोनवर संपर्क,

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री (दोन्ही),आरोग्य मंत्री, पालकमंत्री, यांना आजपर्यंत ४२ वेळेस मेल करून विनंती.

आमदार विक्रम काळे
- ३ वेळा फोनवर संपर्क, सविस्तर माहिती, विनंती.

तत्कालीन मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांचे मुखवटे घालत प्रतीकात्मक भीक मागून निधी संकलन. शासनस्तरावर अविरत पाठपुरावा, जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य सचिव यांच्यासोबत अनेकदा चर्चा.

फलित - फसवा शासन आदेश काढून लातूरकरांचा विश्वासघात. ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये निधी उपलब्ध नाही शासनाकडे. शासन आदेशाची मुदत संपून ४ महिने होत आले आहेत. शासनाकडून जिल्हा रूग्णालय संदर्भात होत असलेली दिशाभूल आणि विश्वासघात संयमी, सहनशील लातूरकर कधीही विसरणार नाहीत.

# गुत्तेदाराचे थातूर-मातूर काम, देशभरातून यात्रेकरू येणार; दत्त जयंती यात्रेपूर्वी पर्यटन निवास अद्ययावत करावे

माहूर शहरातील मातृतिर्थ कुंडाकडे जाणाऱ्या श्री दत्त शिखर संस्थान च्या जागेत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करून या आराखड्यात पर्यटक यात्री निवास बांधण्यासाठी आणि यात्री निवासात आलेल्या भाविकांच्या वाहनासाठी पार्किंगची जागा अद्यावत करण्यासाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी दिला कंत्राटदाराची देयके निघाली नसल्याने दोन्ही कामे अर्धवट असून यात्री निवास भूत बंगला तर पार्किंग चे ठिकाण जुगाराचे अड्डे बनल्याने या इमारतीत थांबण्यासाठी भाविक धजावत नसल्याने पर्यटक यात्री निवास आणि पार्किंगची जागा दत्त जयंती यात्रेपूर्वी पर्यटन निवासाला अद्यावत करावे व कंत्राटदाराने धातुर मातुर कामाची चौकशी करावी माहुरात देशभरातुन यात्रेकरू दाखल होणार आहेत. यात्रेपूर्वी अद्यावत करण्याची मागणी भाविकासह माहूर वासियातून होत आहे.

किनवट/शेख शौकत :-तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील अनेक कामे निधी नसल्याने अर्धवट असून पौराणिक मातृतीर्थ कुंड येथून श्री रेणुका देवी दत्त शिखर कडे जाणारा मार्ग बंद झाल्याने येथे धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी नागरिक येतात शहराच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी



माहूरगड च्या विकासासाठी ७९ कोटी रुपये मंजूर केले होते ७यामध्ये हे पर्यटन यात्री निवास आणि पार्किंग चे ठिकाण दत्तशिखर संस्थानच्या जागेत बनविण्यात आले प्रशासनाच्या दुर्लक्ष मुळे गुत्तेदाऱ्यांनी अर्धवट ए काम सोडलेले दिसून येत आहे. परंतु दाराची देयके वेळेवर मिळाली नसल्याने हे काम त्यांनी अर्धवट सोडले असून जंगलाला लागून निसर्गरम्य परिसरात पर्यटक यात्री निवास ची इमारत अतिशय उत्कृष्ट बांधण्यात आली. आजूबाजूच्या परिसरात विकास कामे झाली नसल्याने ही इमारत अनेक वर्षापासून पडीत होती तर पार्किंग मध्ये पार्किंगच्या ठिकाणी व्यवस्थित काम झाले नसल्याने इमारती तडकल्या असून पार्किंगच्या जागेत प्रचंड मोठाले काटेरी झुडपे उगवल्याने ही जागा पार्किंगच्या लायक राहिलेली नाही त्यामुळे येथे अल्पवयीन मुलाकडून दारू सिगरेट गुटखा खाऊन जगा खराब करण्याचे काम मोठ्या प्रमाणात होते तर अश्लील कामे करणाऱ्यांचा येथे मोठ्या वावर दिसून येतो. पर्यटन यातील निवास आणि पार्किंगच्या जागेला खाजगी तत्त्वावर चालविण्यास दिल्यास इथे मोठ्या प्रमाणात जाहिरात होऊन पर्यटकांचा ओघ वाढत होता परंतु सदरील पर्यटन यात्री निवास दत्त शिखर संस्थान च्या विश्वस्तांनी ताब्यात घेऊन थातूरमातूर सुरू केल्याने येथे पर्यटक तर सोडा पण साधा प्रवासी सुद्धा येऊन थांबण्यासाठी घजावत नसल्याने येणारा श्री दत्त जयंती यात्रेपूर्वी या ठिकाणी जाणारा रस्ता दुहेरी करून योग्य ती अद्यावत दुरुस्ती करत पार्किंग च्या जागेला संरक्षक भिंत बांधून अद्यावत पार्किंग करावी तसेच येणाऱ्या भाविकांना माहितीसाठी ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावावे तसेच इतरही अद्यावत सुविधा या ठिकाणी पूर्वाव्यात जेणेकरून येथे भाविक पर्यटक आणि प्रवाशांचा ओघ वाढेल अशी आशा भाविक पर्यटक आणि माहूर शहर वषातून व्यक्त होत आहे.

# संदीप मोरे यांना आदर्श समाज रत्न पुरस्कार जाहीर

हवेली :- वंचित बहुजन आघाडीचे वाघोली तालुका हवेली मधील प्रभाग क्रमांक - ४ चे अध्यक्ष संदीप मोरे हे तळागाळातील व गरीब जनतेच्या विविध समस्या सोडवण्यासाठी अविरतपणे काम करणारे एक खरे समाजसेवक म्हणून ओळखले जात असून त्यांच्या ह्या विशेष सामाजिक कार्यासाठी त्यांना माणुसकी मल्टी पर्पज फाउंडेशन मलकापूर जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा राष्ट्रपती सेवा गौरव पुरस्कार २०२५ मधील आदर्श समाज रत्न या पुरस्कारासाठी निवड झाली असून रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी हा पुरस्कार त्यांना मलकापूर येथे प्रदान करण्यात येणार आहे



वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर व पुणे शहर उपाध्यक्ष श्री.हिरामण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडी वाघोली प्रभाग क्रमांक - ४ चे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष उल्लेखनीय कार्य करीत आहेत,वाघोली गावातील बऱ्याच गोष्टींची सुधारणा व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी संदीप मोरे यांनी अविरतपणे कार्य केले असून सामान्य जनतेचे विविध प्रश्न जनतेवर होणारा अन्याय अत्याचार,सामाजिक अडीअडचणी असतील तर सगळ्यांच्या मदतीला धावून येणारा एक समाजसेवक म्हणून संदीप मोरे यांच्याकडे मोठ्या आशेने पाहिले जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावलावर पाऊल ठेवून मार्गक्रमण करणे हीच खरी आदरांजली होय. बी. बी. मेश्राम

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त साकेत बुद्ध विहारात सहा डिसेंबरला अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.




सभेला मार्गदर्शन करताना बी. बी. मेश्राम यांनी प्रामुख्याने प्रश्न उपस्थित केला तो असा की आदरांजली, अभिवादन अर्पण करायचे, म्हणजे नेमके काय करायचे? हे निश्चित असायला हवे. तर परिवर्तनवादी आंदोलनाचा कारवाँ वेगाने पुढे घेऊन जाण्यासाठी आपला कृती कार्यक्रम व भुमिका काय आहे? हा प्रश्न आम्ही स्वतः लाच पिंजऱ्यात उभे करून चिकित्सक बुद्धीने विचारला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात अनेकदा सकाळ, दुपार, संध्याकाळ सभा, संमेलने, बैठकांना मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी १८-१८ तास अभ्यास केल्याचे आपण जाणून आहोत. त्यांनी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले आहे. जनतेच्या समस्या निर्मूलनासाठी विविध मार्गाने आंदोलन करून जनतेला संघटीत करण्याचा प्रयत्न केला आहे. संघटीत पणे लढा देत असताना २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास येथील सभेत उपस्थितांना मार्गदर्शन करताना शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा आहे. म्हणून त्याची आपणास दररोज आठवण होत राहावी करिता हे विधान आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवले पाहिजे, असा आदेशयुक्त संदेश दिला होता. त्याची आपण अंमलबजावणी केली आहे काय? उलटपक्षी नुकत्याच देशात संपन्न झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत आलेल्या परिणामावरून आपल्या आंदोलनाची काय वाताहात झाली? हे आपल्या समोर आहे.

आपण सातत्याने भारताचे संविधान यात अंतर्भूत लोकशाही वर बोलत असताना ती लोकशाही आपण आपल्या कुटुंबात, पक्ष, संघटनात, विहारात पाळत आहोत काय? जर आपण पाळत नसलो तर इतरांकडून तशी अपेक्षा कशी बाळगता येईल? करिता २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लॉ लायब्ररीत दिलेल्या भाषणात संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी पाळावयाच्या पूर्वावर्ती शर्थीचे विवेचन केले आहे. त्याचे मर्म आपणास समजून घ्यावे लागेल.

२४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, 'बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे.' तर मग आपण खरच दर रविवारी बुद्ध विहारात जात आहोत काय? जर आपण यापैकी काहीच करीत नसलो तर मग आपणास आदरांजली अर्पण करण्याचा, अभिवादन करण्याचा अधिकार आहे काय? कारण अधिकार प्राप्त होण्यासाठी कर्तव्याचे पालन करावे लागत असते. याची जाणीव ठेवून आम्ही फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून २४ नोव्हेंबर २०२४ ला शहरात सकाळ, दुपार व संध्याकाळी जयभवानीनगर सिडको, साकेतनगर व भारतमाता नगर हडको येथे सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित करून जनतेला सजग करण्याचा प्रयत्न केला आहे व सातत्याने करीत असल्याने आम्हाला आदरांजली अर्पण करण्याचा अधिकार आहे. म्हणून महाप्रयाण दिनानिमित्त त्रिवार अभिवादन करतो.

या प्रसंगी ड. भिमराव मस्के यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तर प्रा.मंगला झिने यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा शेवटच्या चार दिवसातील घटनाक्रम सांगत श्रोत्यांना भावनावश केले. सचिव संघदीप रोडगे यांनी सुत्रसंचालन व आभार व्यक्त केले. भास्कर म्हस्के यांनी अध्यक्षता केली. या अभिवादन सभेला अध्यक्ष भास्कर म्हस्के, सुभाष साबळे, सारंगधर कंकाळ, धनराज गोंडाने, प्रा. सुनील दाभाडे, टी. एन. थोरात, दिनकर जाधव, रमेश जाधव, बाळकृष्ण लोणारे, डॉ. संतोष मोकळे, प्रा. राम प्रसाद डोंगरे, राजकन्या गोडाने, विनयशीला त्रिभुवन, खरे मॅडम, अनिता म्हस्के, सीमा भोसले, रमा कांबळे, नरवडेताई, सुजाता आराक, आशा भिवसानी, ओहळकर मॅडम, महानंदा वाघमारे, कमल साळवे, उषा दाभाडे, जयोती साबळे, रमा जाधव, सरोज मस्के व परिसरातील उपासक हजर होते. सर्वांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्रिवार अभिवादन केले.

# सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीधर स्वामी ; सचिवपदी संतोष करमले

लातूर :- सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी श्रीधर सांबय्या स्वामी यांची तर सचिवपदी संतोष करमले यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने सदाशिव बेडगे यांनी पुढाकार घेऊन राज्यव्यापी विकास परिषदेची स्थापना केली आहे.





रविवार, दि. ८ डिसेंबर रोजी लातूर येथे सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीचे सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या मागच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या वेतनश्रेणी, सेवानियम , अनुदान वाढ आदी प्रश्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. शासन सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रश्नांकडे फारसे गांभीर्याने पाहत नसल्याबद्दल या बैठकीत चर्चा करण्यात आली. सोलापूर येथील ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे लढाऊ नेते सदाशिव बेडगे यांनी याकरिता पुढाकार घेऊन सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास कर्मचारी परिषदेची स्थापना केली आहे. या परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असणार आहे. या परिषदेच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीची या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारीणीतील अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. उपाध्यक्ष सूर्यकांत कमलाकर जाधव, वैशाली दुरुगकर , चंद्रशेखर हणमंतराव ढगे , सहसचिव नागेश्वरी ज्ञानोबा पांचाळ, गुप्तलिंग शिवमूर्ती स्वामी, खजिनदार विद्यासागर गुलाब गायकवाड, सदस्य : हणमंत गोपाळराव भवाळ, रेहान नबीसाब सय्यद, निवृत्ती विठ्ठलराव सूर्यवंशी, गजयसिंह माधवसिंह चौहान, गोविंद गुणवंतराव पाटील, विलास व्यंकटराव नागरगोजे, गिरीधर रंगनाथ जंगाले , सोपं तुळशीराम सूर्यवंशी, शिवहार गुंडेराव बिराजदार, मनिषा दत्तात्रय भिसे, नागनाथ सुग्रीव नागरगोजे, अमरसिंह गंगाधर चव्हाण, कृष्णा विश्वनाथ पिंजरे. नूतन कार्यकारिणीचे परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, कार्याध्यक्ष सुनीलदत्त पाटील, उपाध्यक्ष विजय पाटील, सचिव धोंडीराम जेऊरकर यांसह ग्रंथालय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE